दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com ●मुख्य संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com
● बीड/महाराष्ट्र ● रविवार दि.२७ ऑक्टोबर २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक -७० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# कोकणात त्यांचा एकही आमदार येऊ देणार नाही:एकनाथ शिंदेंचे उद्धव ठाकरेंना आव्हान

## महायुतीत जागावाटपावरुन वाद नसल्याचा दावा

**मुंबई (वृत्तसंस्था)-महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कोपरी-पाचपखाडी येथून अर्ज भरणार आहेत. प्रचाराची औपचारिकता झाली असून एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. त्यांनी बाळासाहेबांचे विचार सोडल्यामुळे कोकणाने त्यांची साथ सोडली. तेथे त्यांचा एकही खासदार आला नाही, आता एकही आमदार येऊ देणार नाही, असे एकनाथ शिंदेंनी एकप्रकारे उद्धव ठाकरेंना आव्हानच दिले.एकनाथ शिंदे म्हणाले, ठाकरे गटाने ठाणे लोकसभा जिंकण्यासाठी जंग जंग पछाडले. मात्र, त्यांना यश आले नाही. कोकणात त्यांचा एकही खासदार आला नाही. आता एकही आमदार दिसणार नाही. त्यांचे सगळे किल्ले उद्ध्वस्त झाले.**



एकनाथ शिंदे यांनी पुढे बोलताना महाविकास आघाडी सरकारवर देखील जोरदार हल्लाबोल केला. महाविकास आघाडीने बंद पाडलेले, स्टे दिलेले प्रकल्प आम्ही सुरू केले, असा दावा त्यांनी केला. आम्ही लाडकी बहीण सारख्या अनेक कल्याणकारी योजना आणल्याचेही शिंदे म्हणाले. महाराष्ट्रास मोठ्या प्रमाणावर उद्योग आले असून विकास आणि योजना यांची सांगड घालण्याचे काम आम्ही केल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे जनता निवडणुकीत आमच्या कामाची पोचपावती देईल. महाराष्ट्रात महायुतीचे सरकार बहुमताने येईल, असा विश्वास एकनाथ शिंदेंनी व्यक्त केला.

आम्ही लाडकी बहीण योजना सुरु केली, त्याचवेळी काँग्रेसचा एक वडपल्लीवार न्यायालयात गेला. मात्र हायकोर्टाने त्यांना चपराक दिली होती. लाडकी बहीण योजना महाविकास आघाडीच्या पोटात सलतीये. त्यांना आता जनता साथ देणार नाही. कोणीही माई का लाल आला तरी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही. त्याचे पैसे वाढत जातील. योजना बंद पाडण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना लोक खाली बसवतील, अस घणाघणात एकनाथ शिंदेंनी केला.एकनाथ शिंदे यांनी महायुतीतील जागावाटपावर सुरू असलेल्या वादावर देखील भाष्य केले. सध्या महायुतीमध्ये कोणताही वाद नाही. महायुतीतील जागावाटपाचा तिढा लवकरच सुटेल. याबाबतच्या काही बाबी नंतर सांगितल्या जातील. आमची दुसरी यादी उद्या येईल, असे ते म्हणाले.लोकसभा निवडणुकीत मशालीविरुद्ध धनुष्यबाण जिंकलेला आहे. त्यावेळी फेकाफेकी करुन, फेक नेरेटिव्ह करुनही धनुष्यबाण भारी पडला होता. लोकांना फसवून देखील लोकसभा निवडणुकीत आमचा स्ट्राईक रेट उबाठापेक्षा चांगला होता. कामाच्या जोरावर महायुतीचा विधानसभेला स्ट्राईक रेट एकदम सगळ्यात भारी असेल. महायुती सर्वांना चारीमुंड्या चित करेल. या निवडणुकीत आमचे लोक चौकार - षटकार मारतील, असा विश्वासही एकनाथ शिंदेंनी व्यक्त केला. लोकसभेत आम्ही १३ जागा समोरासमोर लढल्या. त्यातील ७ जागा आम्ही जिंकल्या. आमचा ४७ टक्के स्ट्राईक रेट होता, तर त्यांचा ४० टक्के स्ट्राईक रेट होता,असे शिंदे म्हणाले.

### बदामराव पंडितांच्या प्रचारासाठी उद्या सभा

# खा संजय राऊत, सुषमा अंधारे यांची तोफ धडाडणार

## गेवराई बाजार तळावर जाहीर सभा

**गेवराई । प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांना महाविकास आघाडीची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांच्या प्रचारार्थ उद्या दिनांक २८ ऑक्टोबर २०२४ रोजी गेवराई शिवसेना नेते खा संजय राऊत, शिवसेना उपनेते सुषमाताई अंधारे यांची तोफ धडाडणार आहे. याप्रसंगी खा बजरंग सोनवणे, खा ओमराजे निंबाळकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.गेवराई विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार बदामराव पंडित यांच्या प्रचारासाठी उद्या दिनांक २८ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता गेवराई कृषी उत्पन्न समिती मोंढा मार्केट यार्ड गेवराई या ठिकाणी शिवसेना नेते संजय राऊत शिवसेना उपनेते सुषमा अंधारे खासदार बजरंग सोनवणे खासदार ओमराजे निंबाळकर यांची जाहीर सभा होणार आहे. याप्रसंगी शिवसेना संपर्कप्रमुख पुरुषोत्तम जाधव, राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेशाध्यक्ष







शेख महेबूब, माजी आरोगयमंत्री राजेश टोपे, शिवसेना सह संपर्कप्रमुख सुनील धांडे, शिवसेना जिल्हा समन्वयक बाळासाहेब अंभोरे, शिवसेना जिल्हा समन्वयक युधाजित पंडित, शिवसेना महिला जिल्हा संपर्कप्रमुख संपदाताई गडकरी, शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट जिल्हाध्यक्ष आ संदीप, क्षीरसागर, काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजसाहेब देशमुख, आम आदमी पार्टी जिल्हाध्यक्ष अशोक येडे, युवासेना जिल्हासमन्वयक पवन चव्हाण, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष श्रीनिवास बेदरे, शिवसेना गेवराई विधानसभा संपर्कप्रमुख सुरेश बावकर यांच्यासह मित्र पक्षाचे प्रमुख पदाधिकारी यांची उपस्थिती राहणार आहे.

गोरगरिबांसाठी २४ तास झगडणाऱ्या आणि सामान्यांच्या हाकेला साथ देणाऱ्या बदामराव पंडित यांच्या विजयावर शिक्का मोर्तब करण्यासाठी आयोजित केलेल्या या जाहीर सभेला गेवराई विधानसभा मतदारसंघातील तमाम मतदार बंधू-भगिनी, शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर, युवक-युवती, कार्यकर्ते आणि नागरिकांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना तालुकाप्रमुख अजय दाभाडे, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड, काँग्रेस तालुकाप्रमुख महेश बेदरे, किसान सेना तालुकाप्रमुख सतीश सपकाळ, शिवसेना अल्पसंख्यांक सेल तालुकाप्रमुख तय्यब पठाण यांनी केले आहे

## लोकशाहीला बळ देण्यासाठी मतदानाची टक्केवारी वाढवणे गरजेचे- मीनल करणवाल




**लोहा । किरण दाढेल**

जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या आपल्या देशात निवडणुका म्हणजे लोकशाहीचा उत्सव असतो, या उत्सवात सर्वांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवून मतदानाची टक्केवारी जास्तीत जास्त वाढवून लोकशाहीला बळ देण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन जिल्हा परिषद, नांदेड च्या मुख्य कार्यकारी अधिकारी माननीय मीनल करणवाल मॅडम यांनी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या स्विप कक्षा द्वारे घेण्यात आलेल्या 'मतदान जनजागृती अभियान' या कार्यक्रमात केले. सदरील कार्यक्रम दिनांक २५ ऑक्टोबर २०२४ रोजी लोहा येथील श्री संत गाडगे महाराज महाविद्यालयात संपन्न झाला. यापुढे त्या म्हणाल्या, या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या सर्व नवमतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजवावा, शिवाय सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांना व इतर नातेवाईकांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करून जास्तीत जास्त मतदान होईल याची दक्षता घ्यावी. या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी अनेक दाखले देऊन लोकशाहीला बळ देण्यासाठी मतदानाची आवश्यकता प्रतिपादित केली. याशिवाय मतदान जनजागृतीसाठी युवा संसद महत्त्वपूर्ण भूमिका बजावते असेही त्या म्हणाल्या. या कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल मॅडम यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना उपस्थित विद्यार्थ्यांना अनेक महत्त्वपूर्ण प्रश्न विचारून त्यांना या प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेतले. तसेच या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मतदान करण्याची शपथ देखील देण्यात आली.

या कार्यक्रमासाठी माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी माधव सलगर, दिलीप बनसोडे, गटशिक्षणाधिकारी संजय येरमे, सतीश व्यवहारे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोकराव गवते, शिक्षण विस्तार अधिकारी सरस्वती अंबलवाड मॅडम, बाबुराव गुट्टे, तसेच बाबुराव फसमल्ले, डी आर शिंदे हे उपस्थित होते. यावेळी संपन्न झालेल्या कार्यक्रमासाठी श्री संत गाडगे महाराज वरिष्ठ महाविद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय, तसेच डी के पाटील फार्मसी कॉलेजचे बहुसंख्य विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

# धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून परळीत अल्ट्राटेक सिमेंट कंपनी उभारणार ६०० कोटींचा अतिरिक्त प्रकल्प

## स्थानिकांना मोठ्या प्रमाणात मिळणार रोजगार

**परळी वैद्यनाथ। प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी अल्ट्राटेक कंपनीला दिलेल्या विश्वासामुळे कंपनीने त्यांच्या परळी येथील सिमेंट ग्रायडिंग युनिटच्या उत्पादन क्षमतेमध्ये पाच पटीने वाढ करण्याचा निर्णय घेतला असून याठिकाणी सुमारे ६०० कोटी रुपयांची गुंतवणूक कंपनीने दोन टप्प्यात करणार असल्याचे जाहीर केले आहे.

या उद्योगामुळे अल्ट्राटेक या जागतिक दर्जाच्या कंपनीचे अतिरिक्त युनिट परळीत उभा राहणार असून त्याद्वारे मोठ्या प्रमाणात स्थानिकांना रोजगार निर्मिती होणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी कंपनीच्या वरिष्ठ अधिकारी यांचे शिष्टमंडळ परळी येथे धनंजय मुंडे यांच्या भेटीला आले होते, यावेळी झालेल्या बैठकीमध्ये सकारात्मक चर्चा झाली असून, कंपनीने क्षमता वाढीसाठी दि.२४ रोजी संपन्न झालेली पर्यावरण जनसुनावणी पार पडल्यानंतर परळी येथील युनिट साठी दोन टप्प्यांत अतिरिक्त ६०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यास मान्यता दिली असल्याचे कंपनीच्या वतीने कळविण्यात आले आहे.

या आधी देखील धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून परळी वैजनाथ शहरालगत इंडिया सिमेंट कंपनीने सदरील युनिट सुरू केले होते. त्याद्वारे देखील मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झालेली आहे.

त्यानंतर आता जागतिक दर्जा प्राप्त असलेली अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या या मोठ्या गुंतवणुकीमुळे मोठ्या प्रमाणात विविध इतर पूरक उद्योगांना चालना मिळणार असून स्थानिकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती देखील होणार आहे. या गुंतवणुकीसाठी मान्यता दिल्याबद्दल धनंजय मुंडे यांनी अल्ट्राटेक कंपनीच्या संचालक मंडळाचे आभार मानले आहेत.



# बदामराव पंडितांना आमदार करण्यासाठी सरपंच संतोष हातागळे यांचा शिवसेनेत प्रवेश

## चव्हाणवाडीत राष्ट्रवादी व भाजपला मोठा हादरा

**गेवराई । प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांना महाविकास आघाडीची उमेदवारी जाहीर होताच गेवराई विधानसभा मतदारसंघातील अनेक गावातील कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश करत आहेत. चव्हाणवाडी येथील असंख्य कार्यकर्त्यांनी बदामराव पंडितांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेमध्ये प्रवेश केल्याने भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला मोठा हादरा बसला आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडी कडून माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांना उमेदवारी जाहीर होताच राजकीय वातावरण चांगले ढवळून निघाले आहे. सातत्याने जनतेच्या संपर्कात राहणाऱ्या बदामराव पंडित यांच्याकडे गोरगरिबांनी सामान्य माणसांचा कल असल्याचे दिसत आहे. त्यांची उमेदवारी जाहीर होताच तलवाडा येथील असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर दिनांक २६ ऑक्टोबर २०२४ रोजी चव्हाणवाडी येथील सरपंच संतोष हातागळे, यांच्यासह शहादेव हातागळे, भगवान हातागळे, बाबुराव हातागळे, अच्युत हातागळे, ओमकार चौधरी, लक्ष्मण हाणगे, महादेव हातागळे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला आहे. गोरगरिबांसाठी आणि सामान्य



माणसासाठी हक्काचा व्यक्ती म्हणून बदामराव आबा हाच प्रत्येकाला आपला माणूस वाटतो आणि म्हणून ते राजकारणात टिकले पाहिजेत, या प्रामाणिक हेतूने बदामराव पंडित यांना गेवराई विधानसभा मतदारसंघाचा आमदार करण्यासाठी आम्ही जीवाचं रान करू. तालुक्याचं पुन्हा वाटोळं होऊ द्यायचं नसेल तर बदामराव पंडित यांच्या मागे शेतकरी कष्टकरी अठरापगड जाती आणि सामान्य माणसाने उभारणे काळाची गरज आहे असे स्पष्ट प्रतिपादन सरपंच संतोष हातागळे यांनी व्यक्त केले. माझ्या अडचणीच्या काळात ज्यांनी ज्यांनी मला साथ दिली आणि जे जे माझ्या सोबत येतील त्यांना आयुष्यभर मी विसरणार नाही अशी स्पष्ट ग्वाही माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी यावेळी दिली.

याप्रसंगी श्रीमंत यादव, काशिनाथ आढागळे, कैलास राठोड, सुनील कांडेकर, उज्वल सुतार, भुजंग शेळके यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संकटात सापडलेल्या मजुरांना मदत करून दिवंगत मित्राच्या स्मृतीला उजाळा देणारे अय्युब शेख आणि फारुक शेख

**केज । गौतम बचुटे**

दिवंगत मित्राच्या सामाजिक कार्याची आठवण कायम रहावी आणि त्यांचे विचार कायम स्मृतीत राहावे म्हणून संकटग्रस्त मजूरांना मदत करून अय्युब शेख आणि फारुक शेख यांनी खरी श्रद्धांजली अर्पण केली.

सामाजिक कार्यात सतत अग्रेसर असणारे दिवंगत लियाकत शेख यांचे अगदी दोन दिवसा पूर्वी दि. २३ ऑक्टोबर रोजी अचानक तीव्र हृदय विकाराच्या झटक्याने अकाली निधन झाले. अगदी चालता बोलता लियाकत शेख यांचे झालेले निधन त्यांच्या कुटुंबासह मित्रमंडळी यांच्यासाठी दुःखद घटना आहे. दिवंगत लियाकत शेख त्यांच्या स्मृती कायम राहाव्यात म्हणून त्यांचे मित्र अय्युब आणि फारुक शेख यांनी मध्यप्रदेश मधील दमुआ जिल्ह्यातील मजुरांना एका मुकादमाने फसवून आणून केज तालुक्यातील एका ऊस तोड मजूर





पुरवठा करणाऱ्या मुकादमाच्या ताब्यात दिले होते. त्या मुकादमाच्या ताब्यातून ते मजूर, महीला व त्यांची लहान मुले यांना सोडविण्यासाठी उच्च पातळीवरून प्रयत्न झाल्या नंतर केज पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांची सुटका केली. त्या सर्वांना पोलीस ठाण्यात मुक्कामाची सोय केली होती.

शुक्रवार दि. २५ ऑक्टोबर रोजी त्या परप्रांतीय मजुरांची आणि त्यांच्या लहान मुलांसाठी अय्युब शेख आणि फारुक शेख यांनी दिवंगत लियाकत शेख यांच्या स्मरणार्थ मित्राच्या सामाजिक कार्याची आठवण कायम रहावी म्हणून त्या परप्रांतीय मजुरांच्या जेवणाची व्यवस्था सोय केली. त्या बद्दल पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन त्यांचे सर्व सहकारी आणि अय्युब शेख आणि फारुक शेख यांचे मित्र यांच्याकडून अभिनंदन आणि कौतुक होत आहे.

## विद्यार्थ्यांना २० नोव्हेंबर पर्यंत ‘अपार’ आयडी द्या

### शिक्षण विभाग ;मुख्याध्यापकांवर कामाचा भार

**छ.संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

यु डायस प्लस प्रणालीमधून पूर्व प्राथमिक,तसेच इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचे 'अपार आयडी' येत्या २० नोव्हेंबरपर्यंत उपलब्ध करून देण्यात यावेत, अशा सूचना राज्यातील सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांना संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांनी द्याव्यात, असे निर्देश महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने परिपत्रकाद्वारे दिले आहेत. त्यामुळे आवश्यक प्रशिक्षण घेऊन सर्व मुख्याध्यापकांना विद्यार्थ्यांपर्यंत अपार आयडी पोहोचविण्याचे काम करावे लागणार आहे. केंद्रीय शिक्षण विभागाने देशातील प्रत्येक विद्यार्थ्याला अपार आयडी उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश दिले होते. त्यासंदर्भात कार्यवाही करण्याच्या सूचनाही दिल्या होत्या. आता प्रत्येक शाळेच्या मुख्याध्यापकांना अपार आयडी तयार करण्याच्या अनुषंगाने प्रशिक्षण देण्याबाबत सूचना केल्या आहेत.राज्य प्रकल्प संचालक कार्यालयाकडून प्राप्त परिपत्रकानुसार अपार आयडी तयार करण्याच्या अनुषंगाने पेरेंट टीचर मीटिंग आयोजित करून शाळास्तरावर पालकांकडून ना हरकत प्रमाणपत्र भरून घ्यावे लागणार आहे.

**ओळखपत्रावर अपार आयडी प्रिंट करावा**

अपार आयडी तयार करण्याच्या दृष्टीने मुख्याध्यापकांना प्रशिक्षण गट स्तरावर प्रशिक्षण द्यावे. तसेच आयडी तयार करण्यासंदर्भात दररोज विभागीय शिक्षण उपसंचालक शिक्षण संचालक व शिक्षण आयुक्त कार्यालयामार्फत आढावा घ्यावा. त्यासंदर्भातील माहिती महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद कार्यालयास पाठवावी. विद्यार्थ्यांना आयडी उपलब्ध करून दिल्यानंतर मुख्याध्यापकांना संबंधित आयडी हा विद्यार्थ्यांच्या ओळखपत्रावर प्रिंट करण्यासाठी कळवावा. माध्यमिक व प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे प्रत्येक आठवड्याला याबाबतचा आढावा घ्यावा, असे परिपत्रकात म्हटले आहे.

## स्मार्ट सिटी डेव्हलपर्स ऑफिस चे शानदार उदघाटन संपन्न

**उरण । विठ्ठल ममताबादे**

उरण तालुक्यातील मोठी जुई येथील प्रविण घासे हे उत्तम सामाजिक कार्यकर्ते असून उत्तम बांधकाम व्यावसायिक देखील आहेत. दिवसेंदिवस त्यांची प्रगती उत्तरोत्तर वाढतच आहे.बांधकाम क्षेत्रात खुप कमी वयात खुप उंच भरारी घेणारे प्रवीण घासे यांनी मोठी जुई येथील ग्रामीण भागातून व्यवसायाला सुरवात करून नवी मुंबईत बांधकाम क्षेत्रात नावारूपाला आले. त्यांनी नवी मुंबईत सर्वांच्या सेवेसाठी बेलापूर येथे स्मार्ट सिटी डेव्हलपर्स या नवीन ऑफिस सुरु केले असून नुकताच त्याचे उदघाटन करण्यात आले. या उदघाटन प्रसंगी उद्योजक यशवंत दादा घासे, शेखर तांडेल, शिवसेना पनवेल उपाध्यक्ष विठ्ठल मुंगजी, उरण भाजप उपाध्यक्ष मुकुंद गावंड,भाजप युवा अध्यक्ष निलेश




पाटील, रायगड जिल्हा उपाध्यक्ष जितेंद्र पाटील, भाजप पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, विशाल पाटेकर, रायगड भूषण हरेश्वर ठाकूर, उद्योगपती कुलदीप नाईक,देवेंद्र पाटील,समीर फडके, कलाकार सनी फडके, गिरीश म्हात्रे,नितेश भोईर, कुमार पाटील, सरपंच दिपक भोईर, धनेश गावंड, मोठीजुई भाजप गाव अध्यक्ष भरत पाटील, उरण विधान सभा विस्तारक करण ठाकूर,नंदन म्हात्रे आदी मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.बांधकाम व्यवसायात चांगली कामगिरी करत असल्याबद्दल व नवीन ऑफिसचे उदघाटन केल्या बद्दल विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवरांनी प्रवीण घासे यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### कुशीनगर बुद्ध विहार सिरसाळा येथे

## पुजनिय भदंत पंय्यातिस्स महाथेरो यांचा वर्षावास समापन कार्यक्रम संपन्न

मौजे सिरसाळा या ठिकाणी प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्सहात कुशीनगर बुद्ध विहार या ठिकाणी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहन व परित्राण पाठ,पुजा, त्रिसरण, पंचशील, अष्टशील, सामुहीक वंदना घेऊन कार्यकमाची सुरुवात झाली नंतर पुज्य भदन्त शीलबोधी महाथेरो व भदंत मुदितानंद थेरो यांची धम्मदेसना झाली. तसेच या प्रसंगी महिला मंडळाच्या वतीने भिक्खु संघास चिवरदान करण्यात आले व आशिर्वाद देऊन या कार्यक्रमाची सांगता पंय्यातिस्स महाथेरो यांनी केली या प्रसंगी मोठ्या संख्येने श्रध्दावान उपासक व उपासिका उपस्थित होत्या.






राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या जिल्हा सरचिटणीसपदी सौ.मंगलताई श्रीकृष्ण सोळंके यांची तर महिला तालुका कार्याध्यक्षपदी सौ.अश्विनी नागोराव सोळंके यांची नियुक्ती करण्यात आली. महिला जिल्हाध्यक्ष सौ. संजीवनीताई देशमुख यांनी त्यांना नियुक्तीपत्र देऊन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या

## केज विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमी वर पोलिसांचे पथसंचलन

**केज । शेख सज्जाद**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस ठाण्याच्या हद्दीत कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दल,सीमा सुरक्षा दल, दंगल नियंत्रण पथक पोलिसांच्या वतीने उप विभागीय पोलीस अधिकारी कमलेश मीना यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली केज शहर,नांदुर घाट,विडा या गावामध्ये जवानांनी सशस्त्र पथ संचलन केले.केज पोलीस स्टेशन पासून जयभवानी चौक,मुख्य रस्ता तसेच नांदुरघाट व विडा या गावामध्ये पथसंचलन करण्यात आले. विधानसभा निवडणुकीमध्ये मतदानाच्या दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये. मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडावी यासाठी सशस्त्र पथ संचलन करण्यात आले.या पथ संचलनात पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, सीमा सुरक्षा दलाचे परसराम,पोलीस उप निरीक्षक शिंदे,सहाय्यक पोलीस निरीक्षक बनसोडे आदी पोलीस कर्मचारी उपस्थित होते.पथ संचलनात सीमा सुरक्षा दलाचे ४८ जवान,दंगल नियंत्रण पोलीस पथकाचे २५ जवान यांच्यासह २५ स्थानिक पोलिसांचा समावेश होता.कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस प्रशासनाने आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणुकीच्या काळात कोणतेही गालबोट लागू नये या साठी हे पथसंचलन करण्यात आले आहे.



# नायगाव येथे भव्य रक्तदान शिबिर संपन्न

**नायगाव । हनुमंत चंदनकर**

नांदेडच्या नायगाव शहरात महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे अध्यक्ष तथा काशी अन्नपूर्णा सत्रचे राष्ट्रीय कोषाध्यक्ष नंदकुमारजी गादेवार यांचा अभिष्टचिंतन सोहळा नायगाव येथील आर्य वैश्य समाज बांधवांच्या वतीने आज दिनांक २६ ऑक्टोबर रोजी भव्य रक्तदान शिबिर आयोजित करून संपन्न झाला कार्यक्रमाची सुरुवात माता कनका परमेश्वरी यांच्या प्रतिमेचं पूजन व पुष्प अर्पण करून झाली कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री राजेश्वर उद्धवराव मेडेवार (डायरेक्टर मर्चंट बँक शाखा नायगाव) प्रमुख पाहुणे श्री विनोद सावकार गंदेवार श्री गजानन चौधरी सावकार प्रसिद्धीप्रमुख लक्ष्मण तुळशीराम मामीडवार सामाजिक कार्यकर्ते वेंकट सावकार देमेवार प्रसिद्ध उद्योजक साईनाथ उत्तमराव वट्टमवार तालुका सदस्य महासभा सतीश सावकार मेडेवार आर्य वैश्य समाज अध्यक्ष नायगाव उद्योजक तथा विभागीय जनगणना प्रमुख पवन गादेवार रमेश सावकार मेडेवार सामाजिक कार्यकर्ते मारुती कत्तुरवार उद्योजक मनोज सावकार आरगुलवार साईनाथ सावकार वट्टमवार अनिरुद्ध सावकार ओलावात सचिन सावकार कोलावार साईनाथ दत्तात्रय मेडेवार राज्य सदस्य आर्य वैश्य महासभा धनंजय चंद्रकांत कौतिक वार तालुका सदस्य महासभा सूर्यकांत अनंतराव कवटीकवर चंद्रकांत गणेश बच्चेवार नरेश सावकार गंधेवार आदी उपस्थित होते नंदकुमार गादेवार यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त महाराष्ट्रभर रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते नंदकुमार गादेवार यांचे राष्ट्रीय योगदानासाठी मोठे कार्य आहे आज त्यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त हजारो रक्तदात्यांनी रक्तदान करून राष्ट्रीय कार्यासाठी योगदान दिले व या रक्तापासून अनेक गरजूंचा जीव वाचू शकते व्यासपीठावरील मान्यवराचा सन्मान सोहळा नायगाव येथील आर्य वैश्य समाज बांधवांच्या वतीने करण्यात आला रक्तदान शिबिरामध्ये अनेक रक्तदात्यांनी रक्तदान करून सहकार्य केले रक्तदान शिबिर दिवसभर चालू होते रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांना समाजाच्या वतीने प्रमाणपत्र भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला नंदकुमार गादेवार यांच्या सहकार्याने समाजातील अनेक दलित पीडित बांधवांना ते सदैव मदत करत असतात व समाजाच्या तळागाळातील तांड्या वाडी वस्त्यात व गावागावात त्यांचं काम उत्कृष्ट चालू आहे व ते सदैव पुढे चालत राहील आणि त्यांचं काम आम्ही एकनिष्ठपणे करू असे भाषणादरम्यान साईनाथ मेडेवार पवन गादेवार यांनी यावेळी समाज बांधवाला प्रबोधन केले.



# मनसेचे उमेदवार रमेश गालफाडे यांची केज शहरात दमदार एन्ट्री

## रमेश तात्या गालफाडे यांच्या उमेदवारी मुळे प्रस्थापितांची धाकधूक वाढली

## केज शहरात आगमन होताच मनसे सैनीकांनी केले जंगी स्वागत

**केज | सचिन भालेराव**

विधानसभा निवडणुकीचे उमेदवारी अर्ज भरण्याची लगीनघाई सुरू आहे.सर्वच पक्षांनी आपापले काही उमेदवार जाहीर केलेले आहेत. तर उर्वरित उमेदवारांबद्दल खलबते सुरू आहेत. परंतु ज्या उमेदवारांची नावे घोषित झालेले आहेत त्यांनी उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात केलेली आहे.यातच केज विधानसभा मतदार संघासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून रमेश तात्या गालफाडे यांना उमेदवारी जाहीर झाल्याने प्रस्थापितांची धाकधूक वाढली आहे.मागच्या अनेक महिन्यांपासून रमेश गालफाडे हे केज मतदार संघामध्ये तळ ठोकून आहेत.मतदार संघातील बहुतांश गावांना त्यांनी भेटी देऊन मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.काही दिवस ते राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाकडून उमेदवारी मिळवण्याच्या प्रयत्नात होते परंतु राशपने माजी आमदार पृथ्वीराज साठे यांना उमेदवारी जाहीर केल्याने राशपचे सर्वांसाठीच दरवाजे बंद झाले. मात्र रमेश तात्या गालफाडे यांनी मोठ्या प्रमाणा वर जनसंपर्क दौरे केल्याने आणि निवडणूक लढवायचीच या उद्देशाने केज मतदार संघामध्ये चाचपणी केल्याने त्यांनी तात्काळ महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली आणि उमेदवारीही पदरात न पाडून घेतली.भाजपकडून विद्यमान आमदार नमिता मुंदडा राशपचे पृथ्वीराज साठे हे उमेदवार निश्चित झालेले आहेत.तसेच माजी आ. संगीता ताई ठोंबरे याही उमेदवार म्हणून विधान सभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याने केज विधानसभा मतदारसंघांमध्ये बहुरंगी लढतीची अपेक्षा आहे.तर राशप कडूनच प्रयत्नशील असलेल्या डॉ.अंजलीताई घाडगे यांनी आपला निर्णय अद्याप जाहीर केला नसला तरी जर त्या निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या तर निश्चितच या निवडणुकीत प्रस्थापितांची डोकेदुखी वाढणार आहे.दरम्यान रमेश गालफाडे यांची उमेदवारी जाहीर झाल्या नंतर प्रथमच केज शहरामध्ये आले असता त्यांचे मनसे सैनीकांच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले.आणि मी माझ्या सामाजिक कार्याच्या जोरावर ही निवडणूक जिंकणारच असा आत्मविश्वास दाखवला असल्याने केज विधानसभा मतदार संघातील मतदार आपली निर्णायक मते कुणाच्या पारड्यात टाकतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.दरम्यान मंगळवार नंतर निवडणूकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.



### महायुतीचे उमेदवार महेश बालदी यांना

## सर्वाधिक मताधिक्य देऊन निवडून आणण्याचा पदाधिकारी कार्यकर्त्यांचा निर्धार

**उरण | विठ्ठल ममताबादे**

उरण तालुका भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा तर्फे उरण पूर्व विभाग मध्ये आवरे,पाले,पिरकोण,सारडे येथील बूथ वर युवा मोर्चाची बैठक संपन्न झाली .यावेळेस उरण तालुका युवा मोर्चा अध्यक्ष तेजस पाटील,उरण पूर्व विभाग युवा मोर्चा अध्यक्ष प्रविण घासे,

उरण तालुका सचिव ड.साहिल हेमंत म्हात्रे, उरण तालुका सोशल मीडिया अध्यक्ष समीर पाटील,आवरे पंचायत गण अध्यक्ष पंकेश म्हात्रे उपस्थित होते. या वेळेस युवकांना व उपस्थितांना सर्व युवा नेत्यांनी संबोधीत केले व निवडणुकीत जास्तीत जास्त काम करण्यास प्रेरीत केले.मुकुंद गावंड,जीवन गावंड,रोशन पाटील, अजित पाटील, अमित म्हात्रे, पंकज म्हात्रे, धनेश पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी महायुतीचे उमेदवार महेशशेठ बालदी यांना सर्वाधिक मताधिक्य देऊन निवडून आणण्याचा निश्चय यावेळी पदाधिकारी कार्यकर्त्यांनी केला आहे.



### रामपूरी ते मंगरूळ रस्त्यावरील जूगारअड्यावर छापा

## सहा जूगार्यासह मूद्देमाल जप्त पोलिसाच्या कारवाईने अवैद्य धंदेवाल्याचे ढाबे दणाणले

**मानवत | प्रतिनिधी**

मानवत पोलिसांच्या पथकाने गोपनिय माहितीच्या आधारे दिनांक २३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ च्या सुमारास रामपुरी ते मंगरुळ जाणाऱ्या रोडवर एका लिंबाच्या झाडाखाली सुरु असलेल्या जुगार अड्यावर कारवाई केली. रोख रक्कमेसह दुचाकी मिळून २ लाख ७ हजार ५६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाई प्रकरणी एकूण सहा जुगाऱ्यांवर मानवत पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मानवत पो.स्टेचे कर्तव्यदक्ष सपोनि. संदिप बोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली, पोउपनि. अनिल खिल्लारे, पोलिस अंमलदार भारत नलावडे, महेश रनेर, विजय लबडे यांच्या पथकाने सदर कारवाई केली. रामपुरी ते मंगरुळ रोडवर एका लिंबाच्या झाडाखाली काही इसम जुगार खेळत बसले होते. या ठिकाणी छापा टाकण्यात आला. लक्ष्मण रामदास घुंगासे, मिलिंद कोंडीराम घटे, विठ्ठल किशन घटे, रवि देविदास इंगळे, विष्णु गंगाराम करकडे, वसंत शंकरराव गायकवाड यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अधिक तपास बीट जमादार भारत नलावडे करत आहेत.



## अंबाजोगाई परिसरात पर्यटन व्यवसायाला भरपूर संधी-ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

अंबाजोगाई परिसरात पर्यटन व्यवसायाला भरपूर संधी असल्याचे मत ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार यांनी व्यक्त केले. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्यावतीने २४ ऑक्टोबर २०२४ रोजी अंबाजोगाई परिसरातील पर्यटनाच्या संधी या विषयावर कार्यशाळेचे उद्घाटन व बीज भाषक म्हणून सुदर्शन रापतवार बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ऍड. माणिकराव बावणे तर व्याख्याते म्हणून प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे उपस्थित होते. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ यांची विशेष उपस्थिती होती. आपल्या विस्तारीत भाषणात सुदर्शन रापतवार यांनी अंबाजोगाई शहराला लाभलेल्या ऐतिहासिक, पौराणिक, नैसर्गिक, धार्मिक पार्श्वभूमीचा सर्वांगिण उल्लेख करीत या गावाची भौगोलिक आणि नैसर्गिक परिस्थिती ही पर्यटन उद्योगाला चालना देणारी असून या परिसरात उपलब्ध असलेल्या या नैसर्गिक परिस्थिताचा उपयोग पर्यटन व व्यवसायाच्या संधी वाढवण्यासाठी करावयाला हवी असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात हा कार्यक्रम घेण्यामागची भूमिका स्पष्ट करून पर्यटन ही आजच्या काळाची महत्त्वाची बाब असल्याचे प्रतिपादन केले. यावेळी बोलतांना प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे यांनी अंबाजोगाई परिसरातील पर्यटन स्थळाची माहिती देऊन अंबाजोगाईच्या परिसरात पर्यटन व्यवसाय विकसित होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबींवर चर्चा केली. तसेच पर्यटनातून तरुणांना रोजगार कशा पद्धतीने उपलब्ध होऊ शकतो. याविषयी माहिती दिली. या कार्यक्रमाचा अध्यक्ष समारोप करताना ऍड. माणिकराव बावणे यांनी अंबाजोगाई व परिसरातील इतिहासाचा आढावा घेऊन अंबाजोगाई परिसरातील ऐतिहासिक घटनांचा दाखला देत अंबाजोगाई परिसरात पर्यटन विकसित होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. अनंत मरकाळे यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी असे १४५ लोक उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन विद्यार्थी समी खान यांनी केले.




## के के एम महाविद्यालयाच्या मानवता वार्षिक अंकाला स्वा रा. ती.विद्यापीठाचा प्रथम पुरस्कार

**मानवत | प्रतिनिधी**

मानवत येथील के. के एम महाविद्यालयाच्या वतीने दर वर्षी मानवता वार्षिक अंक प्रकाशित केला जातो. यंदा २०२३.२४ च्या वार्षिक अंकास स्वा. रा. ती विद्यापीठामध्ये प्रथम क्रमांक आला. २५० अंकात प्रथम पुरस्कार मिळाला त्यामूळे के.के. एम. महाविद्यालय आणि मानवत परिवारासाठी गौरवाची बाब आहे.

भारतीय लोक शाही समोरील आव्हाने हा विषय घेऊन अंक काढण्यात आला होता. या अंकात महाविद्यालया मधील विविध वर्गाच्या विध्यार्थ्यांनी इंग्रजी, हिंदी, मराठीत लेख लिहून या अंकात प्रकाशित केलेले आहेत.या अगोदर ही मानवता अंकास सलग तीन वर्षे प्रथम पुरस्कार मिळालेला आहे. ही बाब महाविद्यालयासाठी गौरवाची बाब आहे. या वर्षी अंकाचे संपादक म्हूणन महाविद्यालययाचे प्राचार्य डॉ भास्कर मुंडे, कार्यकारी संपादक म्हूणन प्रा डॉ पंडित लांडगे, सदस्य डॉ सचिन चोबे, डॉ पवन पाटील यांनी मानवता अंकाचे काम पाहिले.डॉ दुर्गेश रवंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.प्रथम क्रमांक मिळल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. विजयकुमार कत्रुवार, सचिव श्री बालकिशनजी चांडक, कोषाध्यक्ष श्री. रामचंद्रराव कत्रुवार, उपाध्यक्ष श्री अनिलराव नखाते, सहसचिव श्री विजयकुमार दलाल, संचालक श्री. दिलीपजी हिबारे यांच्यासह संचालक मंडळांनी या वेळी संशोधन विद्यार्थी आणि संपादक मंडळाचे अभिनंदन केले.




## महाविकास आघाडीचे उमेदवार बदामराव पंडित यांना विजयी करण्यासाठी पिंपळनेर सर्कल मधील शिवसैनिक लागले कामाला

**गेवराई | प्रतिनिधी**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), काँग्रेस व मित्र पक्ष,महाविकास आघाडी गेवराई विधानसभेचे अधिकृत उमेदवार बदामरावजी आबा पंडित यांच्या प्रचारार्थ पिंपळनेर येथील सिद्धिविनायक गणपतीस नारळ फोडत दर्शन घेऊन आज विधानसभा मतदारसंघात प्रचारास प्रारंभ करत प्रचाराच्या पहिल्या दिवशी पिंपळनेर सर्कल मधील नाथापूर, रंजेगाव,, शहाजानपूर, लोणी,रामगाव, सांडरवण, लिंबारुई, पाटेगाव, पिंपळादेवी, बेडूकवाडी, मुगगांव,

सूर्डी (थोट),बोरदेवी, नबापूर, केसापुरी, परभणी, ताडसोन्ना,

घाटजवळा, वलीपुर, पिंपळनेर या सर्व गावांमध्ये माजी मंत्री बदामराव आबा पंडीत व शिवसेनेचे दोन्ही जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व गणेश भाऊ वरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कॉर्नर बैठका पार पडल्या.. लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी महाराष्ट्रात पुन्हा एकदा जनतेच्या विचारांचे महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आणण्यासाठी गेवराई विधानसभा मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण मला मतदान रुपी आशीर्वाद देऊन आमदार म्हणून मला संधी द्या असे आवाहन भावी आमदार बदामराव पंडीत यांनी मतदार बांधवांशी केले.

यावेळी बोलताना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर म्हणाले कि येणाऱ्या काळात बीड जिल्ह्यामध्ये अनेक लोकांचे प्रवेश महाविकास आघाडीमध्ये होत आहेत आपण बघितले असेल या राज्यामध्ये व देशामध्ये मोदी, फडणवीस आणि शिंदे यांचे सरकार होते या सरकारने सर्व सामान्य माणसाला, शेतकऱ्याला देशोधडीला लावण्याचे काम केले आहे. शेतकऱ्यांच्या कापुस, सोयाबीन असे अन्य पिकांचे भाव कवडीमोल करून ठेवले आहे. म्हणून या सरकारला कायमच घरी बसवण्यासाठी येणाऱ्या २० तारखेला मशाल या चिन्हासमोरील बटन दाबून माजी मंत्री बदामराव आबा पंडित यांच्या रूपाने महाविकास आघाडीला आशीर्वादरुपी मतदान करून जास्तीत जास्त लीडने आमदार करायचे आहे.

जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांनीही सर्वांना मार्गदर्शन करत आपल्या सर्वांच्या हक्काचे लोकनेते म्हणजेच बदामराव आबांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणावे.

याप्रसंगी बीड तालुक्याचे तालुकाप्रमुख गोरख आण्णा सिंघण, माजी जिल्हा परिषद सभापती पंढरीनाथ बापू लगड,सखाराम तात्या मोहिते, कैलासजी राठोड, प्रभू तात्या नांदे, विठ्ठल नांदे, बाळासाहेब नागटिळक, राम शिंदे, विनोद गूंड पाटील, अजय गायकवाड, ऋषिकेश गिरी, सोफीयान शेख,शकील भाई पठाण, सुग्रीव सोजे, ऋषिकेश माठे महाराज ,रुद्रा मते, महेश मते,अमोल देवडकर, अश्विन लांडे, अशोक घुमरे, अर्जुन वाघ, राजेंद्र सातपुते, झुंबर जाधव, मारोती जाधव, पटू इंगोले, कैलास थोटे, बोरदेवी चे सरपंच रवी आरसुळ, राजू नाडे, सिद्धेश्वर नरवडे, उमेश आनेराव, गणेश नरवडे, संजय बप्पा नरवडे, अली शेठ कुरेशी, गोविंद शिंदे सह सर्व गावातील मतदार बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते...!!



# २४ नोव्हेंबर रोजी महायुतीचा मुख्यमंत्री शपथ घेईल-मंत्री चंद्रकांत पाटील




**पुणे (वृत्तसंस्था)**
येत्या २४ नोव्हेंबर रोजी महायुतीचा उमेदवार मुख्यमंत्रीपदाची शपथ घेईल, असा दावा राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी केला. ते कोथरुड विधानसभा मतदारसंघातील उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी पत्रकारांशी बोलत होते.चंद्रकांत पाटील म्हणाले, लोकसभा निवडणुकीतील पराभवामुळे बॅकफूटवर गेल्याने सध्या महायुती ताकही फुंकून पित आहे. २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आहे. तोपर्यंत महायुतीने घोषित केल्या नसलेल्या जागांवर चर्चा सुरू राहील. त्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्री हे जागांचा तिढा सोडविण्यासाठी सर्मथ आहेत. देवेंद्र फडणवीस हे माणसांना समजावून सांगणारे जादूगर आहेत. ते युतीतील जागावाटप व मिळालेल्या जागांवर उमेदवारी देऊन लवकरच मोकळे होतील. देवेंद्र फडणवीस यांची दिवाळी यंदा निवडणूक धामधुमीत जाणार आहे. राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता येईल व २४ नोव्हेंबर रोजी आमचा मुख्यमंत्री शपथ घेईल. महायुतीत मुख्यमंत्री कोण होणार याबाबतचा निर्णय केंद्रीय नेते घेतील, असे मत मंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले.

चंद्रकांत पाटील म्हणाले, माझी उमेदवारी घोषित झाल्यापासून देव देवता आणि देव समान माणसे यांचे आशीर्वाद घेऊन मी कामाला लागलो आहे. शंकर महाराज मठ, कसबा गणपती, स्व. गिरीष बापट कार्यालय, मोतीबाग, मृत्युंजयेश्वर मंदिर, सावरकर स्मारक, धोंडी केशव कर्वे पुतळा व छत्रपती संभाजी महाराज व शिवाजी महाराज यांचे पुतळण्यास अभिवादन केले. माणूस हा एकटा नसून तो दिसणाऱ्या व न दिसणाऱ्या अनेकांचा मिळून आहे. सर्वांचे आशीर्वाद, शुभेच्छा पाठिशी आहेत. कोथरुड मतदारसंघात आमदार झाल्यावर अचानक राज्यातील सरकार गेले, कोविड प्रार्दुभाव झाला.त्यामुळे सलग पाच वर्ष सत्ता मिळू शकली नाही. कोथरुड दक्षिण व उत्तर याठिकाणी सर्व जागी सिमेंट रस्ते व डांबरी रस्त्याचा एकत्रित नियोजन करावे लागणार आहे. वाहतूक कोंडी ठिकाणावर वाहतूक सुरळित करण्यासाठी प्रयत्न करावे लागेल. पुरंदर विमानतळ, रिंग रोड याचा प्रश्न मार्गी लावावा लागणार आहे. मनपा निवडणूक झाल्या नसल्याने मतदारसंघात नगरसेवकांची कामे देखील मलाच करावी लागत आहे. सर्वोच्च न्यायालयात मनपा निवडणूक निर्णय झाल्यावर पुढील कामे सोपी होऊ शकतील.

# सावित्रीच्या लेकीला विधानसभेत पाठवा-सुप्रिया सुळे यांचे आवाहन

## पारनेर येथे राणी लंके यांची विराट सभा ;पारनेरच्या इतिहासातील पहिलीच विक्रमी सभा

**पारनेर । प्रतिनिधी**
.नीलेश लंकेला चॅलेंज करू नका, त्याचा नाद करायचा नाही असा विरोधकांना इशारा देतानाच एक कर्तुत्ववान महिला उद्याची सावित्रीची लेक म्हणून विधीमंडळात जाणार असून राणीताई लंके यांना मोठया मताधिक्क्याने विजयी करण्याचे आवाहन करतानाच इमानदारी ही आपल ताकद असल्याने मी मते मागते असे खा. सुप्रिया सुळे यांनी सांगितले. दरम्यान, पारनेर शहराच्या इतिहासात पारनेरचे बाजारतळ महिलांनी खचाखच भरल्याने राणी लंके यांची ही सभा विक्रमी ठरली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पारनेर-नगर मतदारसंघाच्या उमेदवार राणी नीलेश लंके यांचा उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर बाजार तळावर पार पडलेल्या विराट सभेत सुप्रिया सुळे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी पुढे बोलताना सुळे म्हणाल्या, राणीच्या छोटया घरी ज्यावेळी गेले त्यावेळी माझी भेट झाली. घर लहान पण मन, प्रेम मोठे आहे. नाती काय असतात तर प्रेची असतात, प्रेमाची असतात. शुभकार्य अचडणीच्या काळात माणसे हवी असतात. सत्ता येते जाते, माणसे, प्रेम महत्वाचे असते. राणी आणि नीलेश लंके ही हक्काची माणसे आहेत. राणीला आता आपल्याला विधानसभेत पाठवायचे आहे. हा परिवार हक्काचा असल्याचे सांगतानाच राज्यातील भ्रष्टाचार, महागाई विरोधात ही लढाई असल्याचे सुळे म्हणाल्या. यावेळी बाबाजी तरटे, बापूसाहेब शिर्के, अर्जुन भालेकर, नितीन अडसूळ, जायदा शेख, सुवर्णा धाडगे, पुनम मुंगसे, सविता ढवळे, सुरेखा भालेकर, डॉ. विद्या कावरे, कल्पना शिंदे, विद्या गंधाडे, लकी कळमकर, दीपाली औटी, पाकीजा शेख, यांच्यासह हजारो महिला यावेळी उपस्थित होत्या. लोकसभेपूर्वी बहिण लाडकी नव्हती का असा सवाल करीत तुम्ही लोकसभा निवडणूकीत दणका दिल्यानंतर मात्र सगळया बहिणी लाडक्या झाल्याचा हल्लाबोल सुळे यांनी केला. राखीच्या धाग्यात तागद आहे. पैसा आणि राखीची तुलना होउ शकत नाही. सरकारने बहिणीला दिड हजार रूपये दिले, दुसरीकडे खाद्य तेलाचे आजचे दर काय आहेत ? बहिणींच्या खात्यावर सहा हजार रूपये आले. निवडणूक आल्यानंतर मात्र योजना बंद करण्यात आल्याची टीका सुळे यांनी केली. लोकसभा निवडणूकीत महाविकास आघाडीचे खासदार विजयी झाले. हा विजय उमेदवारांचा नाही तर स्वाभीमानी महाराष्ट्राचा आहे. हा महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले, आंबेडकरांचे नाव घेतो. तो कधीही झुकणार नाही हे या निकालांनी दाखवून दिल्याचे सुळे म्हणाल्या. मी भाजपाचे आभार मानते. मला भांडता येत नव्हते. आमचा घात केला. वडीलांचा घात केला. माझ्या आई वडीलांचा नाद करायचा नाही. विरोधक दिलदार असावा. समोरच्याकडेही ऐकूण घेण्याची ताकद लागते. तुम्ही कितीही धाक दाखवा, जेलमध्ये टाका त्याला कोणी घाबरणार नाही. पक्ष चोरला त्यासाठी खोटी कागदपत्रे तयार करण्यात आल्याचा माझा आरोप आहे. निवडणूक आयोगाच्या कार्यालयात आम्हाला चार-चार तास बसवून ठेवण्यात आले. कधी कोर्टाची पायरी चढलो नाही, आम्ही थेट सर्वोच्च न्यायालयाची पायरी चढलो. ही लढाई चिन्हासाठी नाही तर तत्वाची लढाई असल्याचे सुळे म्हणाल्या.राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर आम्ही सरसकट कर्जमाफी करू, महागाई कमी करून महिलांचा सन्मान राखणाऱ्या योजना राबवू, भ्रष्टाचाराला आळा घालू रोजगार निर्मीती करू, दुध, कांद्याला रास्त भाव देऊ असे आश्वासन सुळे यांनी दिले. इथे बसलेल्या सगळयाच राणी लंके आहेत. आपणच उमेदवार म्हणून प्रत्येकीने कामाला लागायचे आहे. आता एकच लक्ष ठेवा तुतारी वाजविणारा माणूस हे चिन्ह. पाळण्याची दोरी व झेंडयाची दोरी ओढण्याची ताकद राणीताईमध्ये असल्याचे सांगत राणी लंके यांच्यासाठी प्रत्येक भगिनीने प्रचारात सक्रिय होण्याचे आवाहन सुळे यांनी केले. आजच आपला विजय झाल्याचे त्यांनी सांगितले. ज्या महिलांना व्यासपीठ मिळत नाही अशा महिलांना या सभेच्या निमित्ताने व्यासपीठ मिळाले आहे. पुरूष असते तर ही संधी मिळाली नसते. मिळालेल्या या संधीचे आण सोने करार असून तुम्ही मला असेच प्रेम द्या अशी साद लंके यांनी घातली. तुम्ही मला तुमची कोणतीही समस्या निःसंकोच सांगा तिचे निराकरण करण्याची जबाबदारी माझी असेल अशी ग्वाही देतानाच अर्ज दाखल करण्याच्या सभेसाठी हे ठिकाण अपुरे पडले आता विजयी सभेसाठी दुसरे ठिकाण शोधावे लागेल असे त्यांनी सांगितले.



# निवडणूक जिंकलो नाही, तर फाशी घेईन:काय झाडी-काय हॉटेल फेम शहाजी बापू पाटलांचे संजय राऊतांना आव्हान





**सांगोला (वृत्तसंस्था)**
तुम्ही सात-आठ सभा घ्याव्यात. पण मी विजयाचा गुलाल उधळला नाही, तर फास घेऊन मरेन, असे आव्हान सांगोल्याचे आमदार आणि काय झाडी, काय हॉटेल फेम शहाजी बापू पाटील यांनी संजय राऊत यांना दिले आहे. तसेच शहाजी पाटील यांनी पुण्यात सापडलेल्या पैशांवरुन रोहित पवारांवरही निशाणा साधला. पुण्यातील सापडलेले पैसे मोजायला रोहित पवार गेले होते का? असा सवाल शहाजी बापू पाटील यांनी केला. एकनाथ शिंदे गटाने मंगळवारी विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. या यादीत सर्व विद्यमान आमदारांना पुन्हा तिकीट दिले आहे. शहाजी बापू पाटील यांना पुन्हा सांगोल्यातून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांच्यासर रोहित पवारांवर जोरदार हल्लाबोल केला.संजय राऊत हा सकाळी ९ वाजता महाराष्ट्रात भुंकणारा कुत्रा आहे. अशा कुत्र्यांकडे मी लक्ष देत नसतो. माझ्याविरोधात संजय राऊत, त्याचा बाप, आजा यांनी एक नाही तर दहा सभा घेऊ देत...मी त्याला पालथा पाडून तुडवून पुढे जाऊन दाखवेन, असे शहाजी पाटील म्हणाले. संजय राऊतांनी सात-आठ सभा घेऊ द्या, मी विजयाचा गुलाल उधळला नाही, तर फास घेऊन मरेन, असे एकप्रकारे थेट आव्हान शहाजीबापूंनी संजय राऊतांना दिले. उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांच्याकडे महाराष्ट्राविषयी कोणतेही व्हिजन नाही. अडीच वर्षांतील त्यांचे एक काम दाखवा, मी एकनाथ शिंदे यांची हजार कामे दाखवू, अशा शब्दांत त्यांनी ठाकरे गटावर टीका केली.पुणे शहरात सापडलेले पैसे उद्योगपती रफिक शेख यांचे होते. त्यांनी ते कबूलही केले आहे. ते पैसे त्यांचे असल्याची जबाबदारी रफिक शेख यांनी घेतली आहे. हे पैसे एका व्यापाऱ्याचे असताना विनाकारण एकनाथ शिंदे यांना बदनाम करण्याचा प्रयत्न संजय राऊत, जितेंद्र आव्हाड आणि रोहित पवार करीत आहेत, असा आरोप शहाजी बापू पाटील यांनी केला. पाठवलेले पैसे पाच कोटी पेक्षा जास्त असल्याचा आरोप करणारे रोहित पवार रफिक भाईंचे पैसे मोजायला गेले होते का? असा टोला शहाजीबापू पाटील यांनी लगावला. रफिक भाईची श्रीमंती संपूर्ण तालुक्याला माहीत असून त्यांनी हे पैसे आपले असल्याचे सांगितल्याने आता हा विषय संपलेला आहे, असंही शहाजीबापू पाटील यांनी 'एका वृत्तवाहिनी'शी बोलताना सांगितले.

# चिंचोली येथील शेकाप कार्यकर्त्यांनी पक्षाला सोडचिट्टी देत आमदार शहाजीबापू पाटील यांच्या शिवसेनेत केला जाहीर प्रवेश

## आमदार शहाजीबापू पाटील यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार: कार्यकर्त्यांचे आश्वासन

**सांगोला । प्रतिनिधी**
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाच्या शिवसेनेतील सांगोला तालुक्यातील पाणीदार आमदार शहाजीबापू पाटील यांच्या शिवसेनेकडे तरुणांचा कल वाढत असून तरुणांची फळी आमदार शहाजीबापू पाटील यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहत आहे .सांगोला तालुक्यातील चिंचोली गावातील शेतकरी कामगार पक्षाच्या ३० युवा कार्यकर्त्यांनी शनिवार दिनांक २६ ऑक्टोबर रोजी आमदार शहाजीबापू पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयामध्ये आमदार शहाजीबापू पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत जाहीर प्रवेश करून आमदार शहाजीबापू पाटील यांना समर्थ साथ देऊ व येणाऱ्या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत आमदार शहाजीबापू पाटील यांना निवडून आणण्यासाठी जीवाचे रान करू असे आश्वासन यावेळी दिले . शिवसेनेत पक्षप्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांना आमदार शहाजीबापू पाटील यांनी शुभेच्छा देत अभिनंदन केले व सतर्क राहून जास्तीत जास्त मतांनी निवडून देण्याविषयी आवाहन केले.

पक्षप्रवेशावेळी माजी पंचायत समिती सदस्य सुभाष इंगोले, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख सागरदादा पाटील, शिवसेना नेते दादासाहेब वाघमोडे सर ,शिवसेना नेते आनंदकाका घोंगडे, युवा सेना तालुकाप्रमुख गुंडादादा खटकाळे , युवा सेना शहरप्रमुख समीर पाटील यांच्यासह आदी मान्यवर, शिवसेना, युवा सेना पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सांगोला तालुक्यातील चिंचोली गावातील शेतकरी कामगार पक्षाच्या युवा कार्यकर्त्यांनी आमदार शहाजीबापू पाटील यांच्या विकासाच्या मुद्द्यावरती एकत्रित येऊन आमदार शहाजीबापू पाटील यांना विधानसभा निवडणुकीत मोलाची साथ देण्यासाठी व आमदार करण्यासाठी युवा कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने शिवसेनेत प्रवेश केला आहे. शिवसेनेमध्ये प्रवेश करणाऱ्या तरुणांमध्ये शिवाजी सरगर ,सागर पारसे, सुरज पारसे, ,विपुल पारसे, कुमार सूर्यगण ,आशिष खंडागळे ,सुजित करडे,विशाल बनसोडे ,ओंकार ऐवळे, रवी ऐवळे, अजय शेख ,कबीर शेख, आकाश भोसले, अजय भोसले, साहिल भजनावळे ,संजय इंगोले, पंकज ऐवळे, विकास पारसे ,साहिल पारसे, हरी ऐवळे, बळीराम ऐवळे, काशिलिंग ऐवळे ,सुरेश कांबळे, सोमनाथ हेगडे, गोपीनाथ गोरे ,आदित्य ऐवळे, किरण सरगर ,दत्ता काळे, स्वप्नील पारसे, या तरुण कार्यकर्त्यांनी आमदार शहाजीबापू पाटील यांच्या शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश करून सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे . तरुण कार्यकर्त्यांचा शिवसेनेत झालेला प्रवेश हा बापूंसाठी जमेची बाजू आहे.

# दिवाळीच्या पार्श्वभूमीवर एसटीच्या तिकिटांमध्ये १० टक्के वाढ



**मुंबई । प्रतिनिधी**
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) दिवाळीच्या काळात दरवर्षीप्रमाणेच यंदाही तिकीट दरात १० टक्के वाढ जाहीर केली आहे. ही दरवाढ २५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीत लागू असणार आहे. त्यामुळे पुढील १० दिवस प्रवाशांना एसटी तिकिटांसाठी १० टक्के अधिक पैसे मोजावे लागणार आहेत.

सणासुदीच्या काळात प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता महामंडळाने तात्पुरती दरवाढ केली आहे. या निर्णयामुळे प्रवास करणाऱ्या सामान्य जनतेवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे, परंतु गर्दीच्या वेळी प्रवाशांना सुरळीत सेवा पुरवण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेतल्याचे महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077